आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या मागणीनुसार कोळसा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना ३० लाख रुपये प्रति एकर मोबदल्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचा केंद्राकडे प्रस्ताव.
कोळसा प्रकल्पांसाठी अधिग्रहित जमिनीच्या मोबदल्यात सुधारणा करण्याची आ.मुनगंटीवार यांची मागणी; पात्र जमीनमालकांना रोजगार देण्याचीही केली विनंती.
कोळसा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना प्रति एकर ३० लाख रुपये मोबदला देण्याची आ. सुधीर मुनगंटीवार यांची ठाम मागणी.
चंद्रपूर : कोळसा प्रकल्पांसाठी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (WCL) मार्फत अधिग्रहित करण्यात येणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनीला योग्य आणि न्याय्य मोबदला मिळावा, यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केलेल्या मागणीनुसार मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविला आहे. कोळसा प्रकल्पांसाठी अधिग्रहित होणाऱ्या कृषी जमिनीच्या मोबदल्यात सुधारणा करून शेतकऱ्यांना प्रति एकर ३० लाख रुपये मोबदला मिळावा, तसेच पात्र जमीनमालकांना कोल इंडिया लिमिटेडच्या पुनर्वसन व पुनर्स्थापना धोरण, २०१२ नुसार रोजगार मिळावा, अशी मागणी आ. मुनगंटीवार यांनी केली आहे. त्यांच्या या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी केंद्रीय कोळसा व खाण मंत्री जी. किशनजी रेड्डी यांच्याकडे हा प्रस्ताव पाठवला आहे.*
आ. सुधीर मुनगंटीवार यांनी दिनांक ५ जून २०२६ रोजी पत्राद्वारे WCL मार्फत अधिग्रहित करण्यात येणाऱ्या कृषी जमिनीच्या मोबदल्यात सुधारणा करून प्रति एकर ३० लाख रुपये मोबदला देण्याची मागणी केली होती. कोळसा प्रकल्पांसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या जात असताना जुन्या दरानुसार मिळणारा मोबदला हा सध्याच्या जमीन व्यवहारांच्या तुलनेत अत्यल्प आहे. त्यामुळे बदललेल्या परिस्थितीचा विचार करून शेतकऱ्यांना न्याय्य मोबदला मिळणे आवश्यक असल्याची भूमिका आ. मुनगंटीवार यांनी मांडली होती.
२५ मे २०१२ रोजीच्या महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयानुसार कोळसा खाणींसाठी अधिग्रहित होणाऱ्या जमिनीचे दर निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार पडीक जमिनीसाठी ६ लाख रुपये, जिरायती जमिनीसाठी ८ लाख रुपये आणि ओलित (बागायती) जमिनीसाठी १० लाख रुपये प्रति एकर असे दर निश्चित करण्यात आले होते. मात्र, गेल्या काही वर्षांत जमिनीच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. त्यामुळे २०१२ मधील जुन्या दरांऐवजी सध्याच्या परिस्थितीशी सुसंगत असा सुधारित मोबदला निश्चित करून प्रति एकर ३० लाख रुपये देण्यात यावेत, ही आ. सुधीर मुनगंटीवार यांची ठाम मागणी आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील काही खासगी जमीन व्यवहारांमध्ये कंपन्या आणि शेतकऱ्यांमधील व्यवहारांचे दर सुमारे ३० लाख रुपये प्रति एकर असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे कोळसा प्रकल्पांसाठी जमीन अधिग्रहित करताना शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य आणि न्याय्य मोबदला मिळणे आवश्यक आहे.यासोबतच आ. सुधीर मुनगंटीवार यांनी २७ जून २०२६ रोजीच्या पत्राद्वारे वणी परिसरातील कोलगाव विस्तार प्रकल्पासाठी WCL मार्फत अधिग्रहित करण्यात आलेल्या जमिनीच्या बदल्यात पात्र जमीनमालकांना कोल इंडिया लिमिटेडच्या पुनर्वसन व पुनर्स्थापना धोरण, २०१२ नुसार रोजगार उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती.

आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या या मागण्यांची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी १७ ऑगस्ट २०२६ रोजी केंद्रीय कोळसा व खाण मंत्री जी. किशनजी रेड्डी यांना पत्र पाठविले आहे. या पत्रात आ. मुनगंटीवार यांच्या मागणीचा स्पष्ट उल्लेख करत, कोळसा धारण क्षेत्र (अधिग्रहण व विकास) अधिनियम, १९५७ अंतर्गत अधिग्रहित होणाऱ्या जमिनीच्या मोबदल्याचा फेरविचार करून तो इतर जमीन हस्तांतरण व्यवहारांप्रमाणे सुधारण्याचा विचार करावा, अशी विनंती केंद्र सरकारला करण्यात आली आहे.तसेच, पात्र जमीनमालकांना कोल इंडिया लिमिटेडच्या पुनर्वसन व पुनर्स्थापना धोरणानुसार रोजगार उपलब्ध करून देण्याचे निर्देश संबंधित कंपनीला द्यावेत, अशी मागणीही मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी केंद्रीय मंत्र्यांकडे केली आहे.

आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे कोळसा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना प्रति एकर ३० लाख रुपये मोबदला देण्याची मागणी आता केंद्र सरकारच्या स्तरावर पोहोचली आहे. शेतकऱ्यांच्या जमिनीला योग्य मूल्य मिळावे आणि त्यांच्या कुटुंबातील पात्र व्यक्तींना रोजगाराची संधी मिळावी, यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांचा पाठपुरावा सुरू आहे.

या महत्त्वपूर्ण मागणीची तत्काळ दखल घेऊन केंद्र सरकारकडे हा विषय प्रभावीपणे मांडल्याबद्दल आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे आभार मानले आहे. कोळसा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना न्याय्य मोबदला मिळावा आणि त्यांच्या कुटुंबीयांना रोजगाराची संधी मिळावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी दाखविलेल्या सकारात्मक भूमिकेमुळे या लढ्याला निश्चितच बळ मिळाले आहे, अशी भावना आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्र विधानसभा

# सुधीर मुनगंटीवार

विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक : 4347/जुन/२०२६ दिनांक : ०५/०६/२०२६

प्रति,

मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस
मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई-३२

वंदे मातरम् !

**विषय :** वेकोली (Western Coalfields Limited) मार्फत अधिग्रहित होणाऱ्या शेतजमिनीला प्रति एकर ₹ 30,00,000 (तीस लक्ष रुपये) इतका न्याय्य मोबदला देण्याबाबत.

महोदय,

कोल इंडीया अंतर्गत वेकोली (WCL) मार्फत राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये कोळसा उत्खनन व संबंधित प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणावर शेतजमिनीचे अधिग्रहण करण्यात येते. या जमीनी संबंधित शेतकरी कुटुंबांच्या उपजीविकेचे एकमेव साधन असून, जमीन अधिग्रहित झाल्यानंतर त्यांच्या आर्थिक व सामाजिक सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. सध्याच्या बाजारभावाच्या तुलनेत वेकोलीकडून देण्यात येणारा मोबदला अपुरा असून, वाढती महागाई, शेती उत्पादन खर्च, पुनर्वसनाचा खर्च तसेच पर्यावरणीय व आरोग्यावरील दुष्परिणाम लक्षात घेता तो अत्यंत अन्यायकारक ठरत आहे. कोळसा उत्खननामुळे संबंधित भागातील शेती, जलस्त्रोत व पर्यावरणावर दीर्घकालीन विपरीत परिणाम होत आहेत.

दि. २५ मे २०१२ चे शासन निर्णयाव्दारे वेकोलीव्दारे पडीत जमीनीकरीता ६.०० लक्ष, कोरडवाहु ८.०० लक्ष व ओलीत शेतजमीनीकरीता १०.०० लक्ष या प्रमाणे भुमी अधिग्रहणाचा मोबदला लागु केला होता. सन २०१२ ते २०२५ या १३ वर्षाच्या कालावधीत वाढलेली महागाई लक्षात घेता अधिग्रहीत शेतजमीनीचा भाव वाढवून देणे अत्यंत गरजेचे आहे. भुमी अधिग्रहणानंतर २ एकर जमीनीवर कुटुंबातील एकाच व्यक्तीला वेकोलीत नोकरी मिळते व इतर सदस्य भुमीहीन व बेरोजगार होतात.

आपणास विनंती आहे की, वेकोलीमार्फत अधिग्रहित होणाऱ्या सर्व शेतजमिनींसाठी प्रति एकरी किमान ₹ 30,00,000 (तीस लक्ष रुपये) इतका दर शासनस्तरावर निश्चित करण्यात येवून व सहकार्य करावे.

कार्यवाहीबाबत अवगत करावे, ही विनंती.

मुख्य सचिव
प्रस्ताव केंद्र शासनाला
पाठवावे

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रत :

१) मा.जिल्हाधिकारी, चंद्रपूर / यवतमाळ
२) श्री. विजय पिदुरकर मु. माऊली, पद्मावती नगरी, होटल जन्नत मागे, वणी ता.वणी जि. यवतमाळ ९८८१०१२७३४

No. CM/VIP/D.O./550/2026

**Devendra Fadnavis**
**Chief Minister**
Maharashtra

17 AUG 2026

**Mantralaya, Mumbai 400 032**

**Sub: Request for revision of compensation for land acquired under the Coal Bearing Areas (Acquisition and Development) Act, 1957, and provision of employment to eligible landowners as per the Rehabilitation and Resettlement Policy of Coal India Ltd., 2012.**

**Dear Shri. G. Kishan Reddy ji,**

The Western Coalfields Ltd. (WCL), under the administrative control of the Ministry of Coal, Government of India, is acquiring lands for coal excavation in various districts of Vidarbha under the Coal Bearing Areas (Acquisition and Development) Act, 1957. The compensation for land acquisition is also determined in accordance with the provisions of this Act.

Shri. Sudhir Mungantiwar, MLA from Ballarpur, Dist. Chandrapur vide his letter dated 05th June 2026 has requested to revise the compensation at Rs. 30,00,000 per acre for the agricultural land being acquired through Western Coalfields Ltd. Further, he has also requested vide letter dated 27th June 2026 for the provision of employment as per the Rehabilitation and Resettlement Policy of Coal India Ltd, 2012 to eligible landowners in lieu of land acquired for the Kolgaon Expansion Project in the Wani area by Western Coalfields Ltd.

In this regard, kindly note that with the consent of Western Coalfields Ltd., Government of Maharashtra revised the rates for the land being acquired for coal mines, to bring them at par with the rates declared by the Government of Chhattisgadh. These rates are Rs. 6 lakhs/acre for barren land, Rs. 8 lakhs/acre for dry land, and Rs. 10 lakhs/acre for irrigated land, as per the Government Resolution dated 25th May 2012.

Subsequently, the Maharashtra Government vide Government Resolution dated 22nd August 2012 modified the condition no. 4 of the Government Resolution dated 25th May 2012 to extend the benefit to the land for which an agreement between the coal company and the farmer has not been executed under the Coal Bearing Areas (Acquisition and Development) Act, 1957 and the lands in respect of which the awards u/s 11(1) of the Land Acquisition Act, 1894 have not been passed. The Western Coalfields Ltd has challenged the said resolution vide Writ Petition No. 919/2023. The said matter is currently sub judice before the Hon. Bombay High Court, Nagpur bench.



Tel. : 022-2202 5151/2202 5222, E-mail : cm@maharashtra.gov.in,
Website : www.maharashtra.gov.in

**Devendra Fadnavis**
**Chief Minister**
Maharashtra

**Mantralaya, Mumbai 400 032**

The Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (RFCTLARR) Act, 2013 came into force from 01st January 2014. As per Section 105 of the said Act, the provisions of the RFCTLARR Act, 2013 shall not apply to the Coal Bearing Areas (Acquisition and Development) Act, 1957 and other laws of the Central Government as specified in the Fourth schedule. District Collector, Chandrapur has reported a few private sale instances wherein the rates of transactions between companies and the farmers are recorded near about Rs. 30 lakhs/acre in that locality.

Considering the requests by MLA Shri. Sudhir Mungantiwar and the private sale cases reported by District Collector, Chandrapur, I request you to kindly instruct the Ministry to consider revision of compensation at par with the other land transfer transactions for land acquired under the Coal Bearing Areas (Acquisition and Development) Act, 1957, and instruct the company to award employment to eligible landowners as per the Rehabilitation and Resettlement Policy of Coal India Ltd., 2012.

With sincere regards,

Yours Sincerely,

**(Devendra Fadnavis)**

**Shri. G. Kishan Reddy ji,**
Hon. Minister of Coal & Mines,
R.No.353, A-wing, Shastri Bhawan,
New Delhi – 110 001.



Tel. : 022-2202 5151/2202 5222, E-mail : cm@maharashtra.gov.in,
Website : www.maharashtra.gov.in